संसदेच्या विविध समित्या, लोकलेखा समिती, आश्वासन समिती, अंदाज समिती इ. समितीमध्ये तसेच विविध राष्ट्रीय आयोग/ राज्य आयोग इत्यादीमध्ये मा.मुख्य सचिवांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
मुख्य सचिव कार्यालय
शासन परिपत्रक क्रमांकः २०१६/ई-१४५३८८८/का.१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - २ फेब्रुवारी, २०१६

प्रस्तावना-

लोकसभा, राज्यसभा यांच्या विविध समित्या/आयोग तसेच संसदेच्या संयुक्त समित्या, राज्याशी संबंधित विविध मुद्दयांच्या अनुषंगाने राज्याच्या दौऱ्यावर असतात. तसेच विविध राष्ट्रीय न्यायिक आयोगही राज्याच्या दौऱ्यावर असतात. त्यावेळी वरील समित्या तसेच आयोगांकडून आयोजित बैठकीसाठी मुख्य सचिवांना निमंत्रित केले जाते. तसेच राज्य विधीमंडळाच्या लोकलेखा समिती, अंदाज समिती, आश्वासन समिती इ. समितींच्या बैठकांनाही मुख्य सचिवांना निमंत्रित केले जाते. सदरहू बैठकीत उपस्थित मुद्दयांवरील चर्चेत मुख्य सचिवांकडून कार्यवाही करण्याचे अथवा माहिती उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन देण्यात येते. त्याप्रमाणे संबंधित मंत्रालयीन विभागांनी उचित कार्यवाही करुन आयोगास/ समितीस माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

परिपत्रक

संसदेच्या विविध समित्या, विविध राष्ट्रीय आयोग तसेच राज्य विधीमंडळाच्या विविध समित्या यामध्ये चर्चिला जाणाऱ्या विविध मुद्दयांच्या प्रकरणी मा.मुख्य सचिवांकडून कार्यवाही करण्याचे अथवा माहिती उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले जाते. सदर आश्वासनाची नोंद घेऊन त्यानुसार समित्यांना/ विविध आयोगांना सत्वर माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात येत आहेत.

i) राज्य शासनाच्या दौऱ्यावर असणाऱ्या संसदीय समित्या/ राष्ट्रीय आयोग यांच्या बैठकांचा विषय ज्या मंत्रालयीन विभागाशी संबंधित असेल त्या विभागाने मा.मुख्य सचिवांनी बैठकीत दिलेल्या आश्वासनाची नोंद घ्यावी आणि त्याची प्रत मुख्य सचिव कार्यालयास पाठवावी. तसेच सदर आश्वासने विविध विभागाशी संबंधित असल्यास त्या प्रकरणी उचित कार्यवाही व्हावी याद्दष्टीने आश्वासनाची प्रत संबंधित विभागांना पाठविण्यात यावीत.

ii) सदर आश्वासनावरील कार्यवाही ज्या विभागाशी संबंधित असेल त्या विभागाने त्याप्रकरणी नियमानुसार यथोचित्त कार्यवाही करुन **१५ दिवसात** संसदेच्या तसेच राज्य विधीमंडळाच्या समितीस/राष्ट्रीय आयोगास माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही पार पाडावी. तसेच त्याची प्रत मुख्य सचिव कार्यालयास अग्रेषित करावी.

iii) उक्त १५ दिवसांच्या मुदतीत काही कारणास्तव माहिती देणे शक्य नसल्यास ती बाब मुख्य सचिवांच्या निदर्शनास आणून त्यांच्या मान्यतेने संसदेच्या /राज्य विधीमंडळाच्या समितीस/ राष्ट्रीय आयोगास **अंतरिम उत्तर** देण्यात यावे.

iv) वरील i) प्रमाणे कार्यवाही करणारा विभाग आश्वासन पूर्ततेची **एकत्रित माहिती** मुख्य सचिव कार्यालयास सादर करण्यास जबाबदार राहील.

वरील कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. तसेच सदर कार्यपध्दतीचे पालन करण्यात कुचराई झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०२१७३५०४७८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swadheen S Kshatriya

Digitally signed by Swadheen S Kshatriya
DN: c=IN, o=All India Service, ou=Chief Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Swadheen S Kshatriya
Date: 2016.02.05 12:17:13 +05'30'

(स्वा शि क्षत्रिय)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१ मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२ सर्व सन्माननीय संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
३ मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव
४ सर्व मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५ मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६ मा.उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७ मा.सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८ मा. उप सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
९ मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधानभवन,मुंबई
१० मा.विरोधी पक्षनेता (विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
११ सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव , मंत्रालयीन विभाग
१२ सर्व मंत्रालयीन विभाग
१३ निवड नस्ती (का.१).